**S.N.D.T. Women's University**

1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.

Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**

१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in


संलग्नता विभाग/परीपत्रक/२०२३-२४/2226

डिसेंबर २१, २०२३.

## परीपत्रक

विषय : संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांच्या नियुक्तीबाबत...

संदर्भ : परीपत्रक क्र. : १. ॲफि/परिपत्रक/ २०१८-१९/९२२, दिनांक ०४ सप्टेंबर, २०१८.
२. संलग्नता विभाग/परीपत्रक/ २०२३-२४/३२५, दिनांक ०३ मे, २०२३.
३. ॲफि. जन.१/२०२३-२४/१३९३, दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३.
४. शासन निर्णय क्रमांक: नियुक्ती २०११/प्रक्र३४४/११/मशि ५, दिनांक १३ ऑक्टोबर, २०११.
५. शासन निर्णय क्रमांक: नियुक्ती २०११/प्रक्र३४४/११/मशि ५, दिनांक १५ मार्च, २०१२.

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयांत प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य नियुक्त करुन विद्यापीठाकडून त्यांस मान्यता मिळविणे ही संस्थाचालकांची प्रमुख जबाबदारी आहे.

विद्यापीठाच्या असे निदर्शनास येते की, संस्थेमार्फत ठराव मंजूर करुन महाविद्यालयात प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांच्या नियुक्त्या केल्या जातात. परंतू, त्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठ मान्यतेकरिता सादर केले जात नाहीत. तसेच प्राचार्य नियुक्ती वेळेस गठीत केलेली निवड समिती ही संदर्भ : परीपत्रक क्र. : ४ व ५ नुसार आहे किंवा नाही, याचीही दक्षता घेतली जात नाही. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अर्हताप्राप्त नसलेल्या अध्यापकांकडे प्रदिर्घ काळासाठी देउन कामकाज चालवत असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले आहे, म्हणून ज्या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पद नियमित स्वरुपात भरलेले नसेल, अशा ठिकाणी अतिरिक्त कार्यभार देताना कोणत्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा, याबाबतचे निर्देश शासनाने वरील निर्णयान्वये दिलेले आहेत. तरी संस्थाचालकांनी सन २०२३-२४ व त्यापुढे प्रभारी प्राचार्य यांची नियुक्ती संदर्भ : परीपत्रक क्र. : ४ व ५ आधारे केली असल्यास त्यांचे प्रस्ताव खालील कागदपत्रांसह संलग्नता विभागात तात्काळ मान्यतेकरीता सादर करावे.

१. महाविद्यालयाचे पत्र (संस्थेचे अध्यक्ष/ सचिव किंवा कार्यरत असलेले प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांच्या सही शिक्क्यानिशी)
२. संस्थेचा ठराव
३. ना हरकत प्रमाणपत्र (इतर पात्र वरीष्ठ शिक्षकांनी स्वाक्षरी केलेले)
४. शिक्षकांची ज्येष्ठता यादी (पदनाम, रुजू दिनांक, शैक्षणिक अर्हता)
५. संस्थेने दिलेल्या नियुक्ती आदेशाची प्रत
६. नियुक्त झालेल्या प्रभारी प्राचार्य यांचे स्विकृती पत्र
७. नियुक्त झालेल्या प्रभारी प्राचार्य यांचे शैक्षणिक कागदपत्रे

**पद मान्यतेबाबतचा प्रस्ताव विहीत वेळेत विद्यापीठ मान्यतेकरीता सादर न केल्यास...**

१. विद्यापीठ मान्यता नसलेल्या प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांच्या मार्फत केलेला पत्रव्यवहार वैधानिक न समजता त्यावर विद्यापीठामार्फत कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.
२. अशा महाविद्यालयामार्फत आलेले विद्यार्थीनींचे प्रवेश अर्ज व परीक्षा अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

सबब सर्व संस्थाचालकांनी प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य पदांच्या नियुक्तीनंतर विद्यापीठ मान्यता घेणे अनिवार्य आहे. तसेच, प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांची नियुक्ती करतेवेळी विद्यापीठाने व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निर्णय, परीपत्रके यांचे अनुपालन करावे. सदर विषयाबाबत अधिकच्या माहिती करीता विद्यापीठाच्या संलग्नता विभागाशी दुरध्वनी क्रमांक ०२२-२२०९१५७७ किंवा ई-मेल affiliation@sndt.ac.in वर संपर्क साधावा.

- **प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांनी सदर परीपत्रक संस्थाचालकांच्या निदर्शनास आणुन द्यावे.**

**(डॉ. हिम्मत जाधव)**
अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति. कार्यभार)

प्रत माहितीकरीता व उचीत कार्यवाहीकरीता रवाना:
१. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये
२. प्र-कुलगुरू कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
३. कुलसचिव कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
४. श्री. निलेश कासले, एज्युकेशन टेक्नॉलॉजी, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू, सदर परिपत्रक ॲफिलिएशन पोर्टलवर प्रसिध्द करावे.
५. समन्वयक, मे.निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिसेस प्रा.लि, नागपूर सदर परिपत्रक ॲफिलिएशन पोर्टलवर प्रसिध्द करावे.

*c:\rahul affi\university circular\circular.docx*